पुढारी

सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करताना सायबर वॉरिअर्स.

# आळंदीत सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

**आळंदी :** आळंदी (ता. खेड) येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सायबर वॉरिअर्स मानसी जाधव व प्रणव मोरे यांनी फिशिंग, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियावरील वैयक्तिक माहितीचा गैरवापर, सुरक्षित पासवर्डची गरज तसेच इंटरनेटचा जबाबदारीने वापर, या महत्त्वाच्या विषयांवर संवादात्मक सत्रांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी एमआयटी महाविद्यालयाचे अमित ताळे आणि क्विक हील फाउंडेशनचे अजय शिरके यांचेही मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळा श्री समर्थ इंग्लिश मीडियम स्कूल चिंबळी, केळगाव प्राथमिक शाळा, राजे शिवराय विद्यालय आळंदी, पिंपरी-चिंचवड महापालिकेची मुलांची व मुलींची शाळा, मोशीतील शिवाजीराजे स्मारक माध्यमिक विद्यालय यांसह अन्य शाळांमध्ये घेण्यात आल्या.

My Pune Gramin Edition
Aug 29, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com